जलसेवा

कार्यकारी अभियंता
प्रशासन संगणकीकरण विभाग,
जलसंपत्ती भवन, कोथरुड, पुणे- ४११ ०३८
दुरध्वनी:०२०-२५४४०३९५:०२०-२५४४०३८३
ई-मेल eeacd.wrdpune@maharashtra.gov.in

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग

जा.क्र.: प्र.सं.वि./प्र.शा ५ /MERI/ 93 /२०२५ दि. ०२/१/२०२५

प्रति,

१.कार्यकारी अभियंता,मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक.
(लक्षवेध -श्री. आहिरे ,कार्यकारी अभियंता )
२. कार्यकारी अभियंता ,राज्य तांत्रिक सल्लागार समिती १ ,नाशिक
(लक्षवेध -श्री.राहुल पुरी ,उपविभागीय अभियंता )
३.वैज्ञानिक अधिकारी, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था ,नाशिक.
(लक्षवेध -श्रीमती बागुल , वैज्ञानिक अधिकारी)
४.उपविभागीय अभियंता ,जलविज्ञान व धरण सुरक्षितता, नाशिक.
(लक्षवेध -श्री.पुरी , उपविभागीय अभियंता )
५.सहायक अभियंता श्रेणी १ ,महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रवोधिनी ,नाशिक.
(लक्षवेध -श्री.महाजन , सहा.अभियंता श्रेणी.१ )
६. कार्यकारी अभियंता ,कृष्णा पाणी तंटा लवाद विशेष कक्ष ,पुणे.
(लक्षवेध -श्री.रिठे , सहा.अभियंता श्रेणी.१)

**(सर्व मेरी पोर्टल नोडल अधिकारी )**

**विषय – मेरी पोर्टल संकेतस्थळाच्या विकसन बाबत .**

**संदर्भ** :- १) २० व्या प्रकल्प अंबलबजावणी समितीचे इतिवृत्त दि. २८/११/२०२३
२) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./प्र.सं.वि./MERI /१०६२/२०२४ दि.०५/११/२०२४
३) मा.सचिव (प्रकल्प समन्वय ) जलसंपदा विभाग यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेली ई - प्रशासन प्रकल्प आढावा बैठक दि. २८/१०/२०२४ रोजीचे निर्गमित इतिवृत्त दि.१८/११/२०२४.
४) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./प्र.सं.वि./MERI /११२३/२०२४ दि.२८/११/२०२४
५) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./प्र.सं.वि./MERI /११५५/२०२४ दि.०९/१२/२०२४

मा. महासंचालक, संकल्पन,प्रशिक्षण,जलविज्ञान ,संशोधन व धरण सुरक्षितता नाशिक अंतर्गत असणाऱ्या मु.अ. जलविज्ञान प्रकल्प, मेरी, धरण सुरक्षितता संघटना, मेटा , मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना व कृष्णा पाणी तंटा लवाद इ. या सर्व संस्थांचे एकत्रित संकेतस्थळ तयार करण्याच्या कामाच्या प्रस्तावास संदर्भ क्र.१ अन्वये प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता रु ९५.०४ लक्ष (GST सह) प्रदान करण्यात आली आहे.उपरोक्त कामाकरिता निविदा प्रक्रीये अंती निवड झालेल्या संबंधित अभिकरणाशी करारनामा करण्यात आला तसेच दि.२६/०८/२०२४ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. यापूर्वी मा. महासंचालक, संकल्पन,प्रशिक्षण,जलविज्ञान ,संशोधन व धरण सुरक्षितता नाशिक अंतर्गत पोर्टल विकसनासाठी FRS(Functional Requirement Specification) बाबत चर्चा करण्यात येऊन त्यास मंजुरी प्राप्त झाली आहे.तसेच सदर संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याच्या Tabs व Subtabs ची माहिती या कार्यालयास प्राप्त झाली आहे.सदर कामावावत दि.१५/१०/२०२४ रोजी सर्व नियुक्त नोडल अधिकारी यांसोबत ऑनलाईन वैठक आयोजित करण्यात आलेली होती.सदर बैठकीत सर्व नोडल अधिकारी यांना मेरी पोर्टलबदल सविस्तर माहिती देण्यात आली आहे तसेच त्यांच्या शंकांचे निरसन सुद्धा करण्यात आलेले आहे.

Scanned with OKEN Scanner

सद्यस्थिती मध्ये संकेतस्थळ विकसन पूर्ण करण्यात आले असून संदर्भ क्र.२,४ व ५ अन्वये संकेतस्थळावरील Tabs व Subtabs मध्ये भरण्यास आवश्यक असलेली अद्यावत माहिती संबंधित संस्थांकडून मागविण्यात आली तसेच प्राप्त माहिती संकेतस्थळावर विकासकामार्फत भरण्यात आली आहे .

संदर्भ क्र.३ अन्वये मा.सचिव (प्रकल्प समन्वय ) जलसंपदा विभाग यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या दि. २८/१०/२०२४ रोजीच्या ई - प्रशासन प्रकल्प आढावा बैठकीमध्ये मेरी संकेतस्थळाचे विकसन विहित वेळेत पूर्ण करण्यात येऊन संकेतस्थळ सत्वर कार्यान्वित (Go-Live) करण्याबाबतचे आदेश या कार्यालयास प्राप्त झालेले आहेत. त्यानुषंगाने सदर संकेतस्थळाच्या http://businessglory.in/thegov/Home या डेमो लिंकचे अवलोकन करून आपणास आवश्यक असलेले बदल व त्यानुषंगाने लागणारी माहिती तयार ठेवावी.जेणेकरून सर्व संबंधित नोडल अधिकार्यांसोबत खालीलप्रमाणे ऑनलाईन बैठक घेण्याचे तसेच चर्चा करण्याचे नियोजन आहे.

| अ.क्र. | संस्था /कार्यालय | ऑनलाईन बैठकीकरिता वेळेचा तपशील |
|---|---|---|
| १ | राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती (SLTAC) | दि.०६/०१/२०२५ रोजी दु.३ वा. |
| २ | मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना (CDO) | दि.०६/०१/२०२५ रोजी दु. ४ वा. |
| ३ | महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी (META) | दि.०६/०१/२०२५ रोजी दु.५ वा. |
| ४ | कृष्णा पाणी तंटा लवाद विशेष कक्ष (KWDT) | दि.०७/०१/२०२५ रोजी दु.३ वा. |
| ५ | जल विज्ञान व धरण सुरक्षितता (HP& DSO) | दि.०७/०१/२०२५ रोजी दु.४ वा. |
| ६ | महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (MERI) | दि.०७/०१/२०२५ रोजी दु.५ वा. |

सदर बैठकीतून प्राप्त होणारे बदल तसेच सूचना यांची परिपूर्तता करून मा.महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व धरण सुरक्षितता, नाशिक तसेच त्यांच्या अंतर्गत असलेले मा.मुख्य अभियंता यांसमोर दि.१०/०१/२०२४ रोजी संकेतस्थळ सादरीकरण करण्यात येणार आहे.

तरी तत्पूर्वी परिपूर्ण संकेतस्थळ कार्यान्वित करण्याचे असल्याने कामाची निकड लक्षात घेता संकेतस्थळाचे अवलोकन करून या कार्यालयास आवश्यक कार्यवाही साठी सूचित करावे.

मा.सचिव (प्र.स.) यांचे प्राप्त निर्देशान्वये सदर बाबतचे महत्व / निकड लक्षात घेऊन प्राधान्याने कार्यवाही करण्यात यावी हि विनंती.

हे आपले माहितीस्तव व कार्यवाहीस्तव सस्नेह अग्रेषित.

अक्षय बर्कले
कार्यकारी अभियंता
प्रशासन संगणकीकरण विभाग
पुणे

**प्रत:** मा.अधीक्षक अभियंता, जलसंपदा ई-प्रशासन मंडळ , पुणे माहितीस्तव सविनय सादर.

Scanned with OKEN Scanner